# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका अंतर्गत वाहने व यांत्रिकी विभागाचे बैद्यनाथ
**{प्रकल्प विभाग}** चौकातील कार्यशाळेचे (Workshop) नुतनीकरण व सुधारणा करण्याचे कामास मा. आयूक्त यांनी दि. 17/03/2023 रोजी रु. 3,68,25,577/- राशीच्या प्राकलणास मंजुरी प्रदान केलेली आहे.

या कामाकरीता रु. 3,68,25,577/- राशीला प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर.

टिप:-

1. प्रस्तृत कामाकरीता स्वच्छ भारत अभियान (SBM – 1 Single Nodel Account) अंतर्गतशासन निधीतुन करण्यात येईल.
2. सदर कामाकरीता मा.आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.
3. सदर कामाकरीता मा. मुख्य अभियंता यांची रु. 3,01,91,043/- राशीला दि. 10/03/2023 रोजीची तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.
4. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 326/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 27/03/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका अंतर्गत वाहने व यांत्रिकी विभागाचे बैद्यनाथ चौकातील कार्यशाळेचे (Workshop) नुतनीकरण व सुधारणा करण्याचे कामास मा. आयूक्त यांनी दि. 17/03/2023 रोजी रु. 3,68,25,577/- राशीच्या प्राकलणास मंजुरी प्रदान केलेली आहे.

या कामाकरीता रु. 3,68,25,577/- राशीला प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**